REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख १० ऑगस्ट, १९३८ | अंक ३२

CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS
Last year 1936-37
Exceeds
2 CRORES & 82 LAKHS

BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment **Rs. 23** | On Whole Life **Rs. 20**

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

(ESTD. 1907)

Branches : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
Office throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

K. K. & Co.

Photographic Dealers
POONA.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोग्राफ प्रिंटिंग, सडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६२५ सदाशिव पेठ.

'अभिनंदनीय प्रगति' असेच बोल नाशिकच्या **सह्याद्रि** विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधी व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.

लिहा अगर भेटा. | **मॅनेजिंग डायरेक्टर**

स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचें यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. (रि. नं. ६)
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

विविध माहिती

बँकांस सुट्टी

बुधवार, ता. १० ऑगस्ट रोजीं नारळीपौर्णिमेनिमित्त बँका बंद रहातील.

ट्रेझरी बिलांवर १० आ. १ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १½ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं. त्यांवर व्याजाचा सरासरी दर द.सा.द.शे. १० आ. १ पै इतका पडला,

जगांतील निम्मे रेडिओ एकट्या अमेरिकेंत

सबंद जगांत एकूण ७ कोटि रेडिओ आहेत, त्यांपैकीं सुमारें निम्मे रेडिओ एकट्या अमेरिकेंत आहेत.

खासगी मोटारगाड्यांचें आयुष्यमान

खाजगी मोटारगाड्यांचें आयुष्य ग्रेटब्रिटनमध्यें सरासरीनें सुमारें साडेसात वर्षे असतें असा चोकशीअंतीं निष्कर्ष काढण्यांत आला आहे.

सरकारी पुस्तकांचा खप

सरकारी अहवाल, माहितीचीं पुस्तकें व चोपडीं वगैरे ब्रिटिश स्टेशनरी ऑफिस हें खातें प्रसिद्ध करतें, त्यांची वार्षिक संख्या पांच हजार भरते. त्यांपैकीं कित्येकांच्या प्रत्येकीं एक ते दोन लाख इतक्या प्रती खपतात. ही सरकारी विक्रीची व्यवस्था फायदेशीर होते.

मराठा चेंबरची वार्षिक सभा

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज पुणें, या संस्थेची वार्षिक सभा शनिवार तारीख २० रोजीं ५ वाजतां भरणार आहे.

ब्रिटिश सायकलींचा धंदा

सायकलींच्या कारखान्यांत ग्रेट ब्रिटनमध्यें वीस कोटि रुपयांचें भांडवल गुंतलेलें असून पन्नास हजार माणसें कामावर आहेत. सायकल वापरणारांची संख्या त्या देशांत सुमारें एक कोटि, वीस लक्ष आहे. गेल्या वर्षी ब्रिटिश कारखान्यांत तीन कोटि रुपये किंमतीच्या साडेअठरा लक्ष सायकली तयार होऊन त्यांपैकीं आठ लक्षांचे वर परदेशांत विकल्या गेल्या.

सायकलींचा सुवर्णमहोत्सव

रबराच्या फुगीर नळीवर चालणाऱ्या सायकलींचें पेटंट जॉन डन्लाप नांवाच्या गृहस्थानें १८८८ मध्यें घेतलें आणि तेव्हांपासून सायकलस्वार होण्याची सोय सामान्य माणसांस उपलब्ध झाली. सायकलींच्या व्यवसायाचा, ह्याप्रमाणें, सुवर्णमहोत्सव यंदा आहे.

सिलोनी चलन आणि हिंदी रुपया

सिलोनमधलें चलन हिंदी रुपयावर आधारलेलें आहे आणि त्याच्या संरक्षणार्थ सुमारें दीड कोटि रुपयांचें नाणें निधीमध्यें ठवण्यांत आलें आहे. सिलोनी चलन स्वतंत्र करावें व ब्रिटिश पौंडासहि जोडण्यांत यावें ह्या सूचनेची चौकशी सध्या चालू आहे.

अमेरिकेच्या राष्ट्रीय कर्जांत वाढ

आर्थिक मंदीच्या निवारणार्थ प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं कोट्यवधि रुपयांचें राष्ट्रीय कर्ज काढून सार्वजनिक उपयोगासाठीं पाण्यासारखा पैसा खर्चला आहे. अमेरिकेचें राष्ट्रीय कर्ज पांच सहा वर्षांत दोन हजार कोटि डॉलर्सपासून पावणेचार हजार कोटि डॉलर्सपर्यंत चढलें आहे. १९३० सालाच्या मानानें कर्जाची वाढ १३२ टक्के झाली आहे. ह्या मुदतींत ब्रिटिश राष्ट्रीय कर्ज फक्त आठ टक्क्यांनीं वाढलें.

सोन्याचें जागतिक उत्खनन

जगांतील सर्व खाणींतून १९३१ सालीं एकूण २२४ लक्ष औंस सोनें बाहेर निघालें. ह्या उत्खननांत हळूहळू वाढ होत जाऊन १९३७ मध्यें तें ३५९ लक्ष औंसापर्यंत वाढलें.

दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेची मुख्य कचेरी वाढत्या कामाच्या व्यापामुळें जास्त प्रशस्त जागेंत नेणें भाग पडलें आहे. कचेरीचा नवीन पत्ता, “सर विठ्ठलदास चेंबर्स, अपोलो स्ट्रीट, इंपीरिअल बँक-समोर, मुंबई” असा आहे. बँकेचें खपतें भांडवल आतां सुमारें ६ लक्ष रुपये झालें आहे. बँकेकडील ठेवींत वाढ होत चालली आहे.

झारापकर टेलरिंग कॉलेज

ता. ६ ऑगस्ट रोजीं येथील झारापकर टेलरिंग कॉलेजमध्यें श्री. मामासाहेब वरेरकर यांचें ‘बेकारी निवारण व त्यांत शिवण-कलेचें स्थान’ या विषयावर श्री. नानासाहेब सरपोतदार यांचे अध्यक्षतेखालीं भाषण झालें.

क्षयरोग-निवारण फंडाचा विनियोग

लेडी लिन्लिथगो क्षयरोग-निवारण फंडापैकीं शेकडा ७५ इतकी रकम क्षयरोगाचा उद्भवच होऊं नये अशी तरतूद करण्याच्या योजनांकडे खर्च व्हावयाची आहे. क्षयरोगानें पछाडलेल्यांस वैद्यकीय मदत देणें आवश्यक असलें, तरी ह्या रोगाचें निर्मूलन करणें दीर्घ-परिणामी होईल हें उघड आहे.

मुंबई येथील सिगारेटच्या कारखान्याची योजना

लंडन येथील एक कंपनी मुंबईंत एक सिगारेटचा कारखाना स्थापन करणार आहे. ह्या कारखान्यांत हिंदी मुलांस नोकरी देण्याची योजना कंपनी आखीत असून, त्यांस सिगारेटच्या धंद्याविषयीं माहिती देण्याकरितां दर आठवड्यास निवडक बारा मुलांस कारखान्यांतून फिरविण्यांत येईल. व्याख्यानें व प्रात्यक्षिकें ह्यांचे सहायानें हें शिक्षण दिलें जाईल.

इंडस्ट्रिअल ॲडव्हायसरी बोर्ड

मुंबई सरकारनें नेमलेल्या इंडस्ट्रिअल ॲडव्हायसरी बोर्डाची पहिली सभा गेल्या आठवड्यांत भरली होती, त्यावेळीं मुंबई प्रांतांतील उद्योगधंद्यांच्या वाढीसंबंधानें अनेक सूचना पुढें येऊन त्यांवर चर्चा झाली.

पानाडी डच बाई

“कोणत्या जमिनीखालीं पाणी लागेल, हें सांगणारी एक डच बाई हिंदुस्थानांत येण्यास तयार आहे. ज्या प्रांतिक सरकारांस तिच्या ह्या नैसर्गिक शक्तीचा उपयोग करून घ्यावयाचा असेल, त्यांनीं त्याप्रमाणें कळवावें” अशा अर्थाचें पत्र हिंदुस्थान सरकारनें सर्व प्रांतिक सरकारांस पाठविलें आहे. मुंबई प्रांतास मेजर पॅागसन ह्या पानाड्याची स्मृति अद्याप ताजी आहे.

काटकसरीमुळें कार्यक्षमतेस बाध आला नाहीं

हिंदी पोस्ट आणि तारखात्यांत गेल्या दोन वर्षांत अंमलांत असलेल्या काटकसरीच्या योजनांमुळें त्या खात्याच्या कार्यक्षमतेस बाध आलेला नाहीं, असें श्री. मित्र ह्यांनीं आपल्या रिपोर्टांत नमूद केलें आहे. ह्या रिपोर्टाचा हिंदुस्थान सरकार विचार करीत आहे.

मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

	किंमत रुपये
२४-७-३८ ते ३०-७-३८	५४,६१,१८७
३१-७-३८ ते ६-८-३८	७०,७८,७९८
२१-९-३१ ते ६-८-३८	३,१८,४९,०९,०४४

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	३८६	५ हाडापासून खत. ...	३९०
२ नाशिक आणि केरा येथील सहकारी बँका ...	३८७	६ सदर्न निटिंग वर्क्स लि.	३९१
३ रक्तांतर आणि पितृत्व	३८८	७ सहकारी चळवळ ...	३९२
४ स्फुट विचार... ...	३८९	८ खेडेगांवांत पाणीपुरवठा	३९२
जगांत सोन्याचा वाढता पुरवठा–म्युनिसिपॅलिट्यांचा गैरशिस्त कारभार–एम्प्लॉयमेंट ब्यूरोची मर्यादित उपयुक्तता–हिंदी विमा कंपन्यांस प्राधान्य–रोखे बाजारांत मार्जिन्सची सक्ती.		९ ग्रेटब्रिटनमधील आयुर्विम्याची प्रगति. ...	३९२
		१० ग्रन्थ संग्रहालयांचें महत्त्व	३९३
		११ हिंदी साबणाचा धंदा	३९३
		१२ मोटारगाड्यांचें हिंदुस्थानांत उत्पादन. ...	३९४
		१३ निवडक बाजारभाव	३९५

अर्थ

बुधवार, ता. १० ऑगस्ट, १९३८

नाशिक आणि केरा सहकारी बँका

नाशिकची जिल्हा सहकारी बँक बंद होऊन तिचा कारभार गुंडाळण्यांत यावा असा हुकूम सहकारी रजिस्ट्रारनीं काढला तेव्हां लोकांमध्यें खळबळ उडून गेली हें सहाजिकच झालें. सहकारी संस्थांवर सरकारी अधिकाऱ्यांची नजर आणि नियंत्रण असल्याकारणानें त्यांवर असली आपत्ती सहसा येणार नाहीं अशी सामान्य समजूत आहे आणि ती बहुतांशीं साधार आहे. सहकारी बँकांचे भागीदार आणि विशेषतः त्यांमध्यें ठेव ठेवणारे लोक ह्यांचा ह्याच प्रकारचा विश्वास असल्यानें नाशिक बँकेवर आलेला प्रसंग अनपेक्षित होता आणि त्यासंबंधानें अधिकृत माहिती सहकारी खात्यानें प्रसिद्ध करावी अशी मागणी वृत्तपत्रांत करण्यांत आली. ही माहिती मिळण्यास बराच वेळ लागल्यानें असमाधानहि व्यक्त करण्यांत आलें. गेल्या आठवड्याचे अखेरीस सरकारी पत्रक प्रसिद्ध होऊन त्यांत नाशिक आणि केरा जिल्हा बँका कां गुंडाळाव्या लागल्या ह्याविषयीं खुलासा करण्यांत आला आहे. ह्या दोन बँकांची सांपत्तिक परिस्थिति समाधानकारक नसल्याचें अनेक सहकारी कार्यकर्त्यांस गेलीं चारपांच वर्षे माहीत होतें यांत शंका नाहीं. श्री. पंजाबी रजिस्ट्रार असतांना नाशिक बँकेंत सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न झाले हें कित्येकांस आठवतहि असेल. तथापि, असे यत्न होत असतां ती शेवटीं गुंडाळण्याची पाळी येईल असें क्वचितच लोकांस वाटलें असेल. सहकारी संस्थांची पुनर्घटनेच्या दृष्टीनें सरकारची पहाणी चालली असतांना जिल्हा बँकांच्या परिस्थितीविषयीं चौकशी होऊन वरील दोन बँका बंद करणें आवश्यक असल्याचें दिसून आलें असें सरकारी पत्रकांत म्हटलें आहे." ह्या बँका अनेक वर्षे अडचणींत होत्या; गुणपरत्वें त्यांचा खालचा म्हणजे "क" वर्ग होता; पतपेढ्यांस कर्जाऊ देण्यास त्यांचेपाशीं पुरेसा पैसा नव्हता आणि व्याजाचे दरहि कमी करणें त्यांस शक्य नव्हतें; त्या सुधारण्याचे केलेले सर्व प्रयत्न निष्फळ ठरले; त्यांतच आर्थिक मंदीची भर पडली; ह्यामुळें त्या गुंडाळण्यावांचून गत्यंतर उरलें नाहीं." येणेंप्रमाणें सरकारी पत्रकाचा मथितार्थ आहे.

सहकारी जिल्हा बँकांची समाधानकारक परिस्थिति

सहकारी बँकांवरचा लोकांचा विश्वास यथार्थ असून नाशिक आणि केरा ह्या बँका ह्या नियमास अपवाद आहेत अशी आपण चौकशीअंतीं खात्री करून घेतली असल्याविषयींचें सरकारच्या पत्रकांतलें आश्वासन समाधानकारक व उत्तेजनदायक आहे. प्रांतिक बँक आणि जिल्हा बँका ह्यांची परिस्थिति चांगली आहे; त्यांचेपाशीं पुरेसें भांडवल आणि निधी आहेत; शक्तिहीन पतपेढ्यांस सहाय करण्याचें सामर्थ्य त्यांचेमध्यें आहे असा तपशील देऊन ह्याबद्दल सरकारनें पूर्ण समाधान व्यक्त केलें आहे. दोन बँका नाइलाजानें गुंडाळाव्या लागल्या ह्याविषयीं खेद प्रदर्शित करून इतर सर्व बँकांची स्थिति उत्तम असल्याबद्दल सरकारनें लोकांस निर्वाळा दिला आहे. ही समाधानकारक स्थिति टिकेल अशी खबरदारी घेण्याचें आश्वासनहि सरकारी पत्रकांत देण्यांत आलें आहे. नाशिक आणि केरा बँकांच्या ठेवीदारांच्या पैशाची व्यवस्था काय होणार, ह्याची धनकोंस चिंता लागणें स्वाभाविक आहे. बँकांचा कारभार गुंडाळला गेला असतां त्यांच्या घेणेंदारांस आपले पैसे परत मिळण्यासाठीं वाट पहावी लागते, तसेंच येथेंहि होणार हें उघड आहे. ह्याच्याहि पेक्षां अधिक महत्वाचा प्रश्न सरकारास सोडवावयाचा आहे, तो नाशिक आणि केरा जिल्ह्यांतल्या पतपेढ्यांच्या पैशाच्या व्यवस्थेबाबतचा आहे. मध्यवर्ती बँका बंद झाल्यानें ह्या पेढ्यांस पैसा मिळण्याची व्यवस्था करणें अगत्याचें आहे. ह्या सर्वच पतपेढ्या नीट चालू रहातील किंवा नाहीं, त्यांच्या सभासदांकडून येणें असलेल्या कर्जांची फेड कशी होईल आणि त्यांस चालू शेतकामासाठीं लागणारा पैसा कोण पुरवणार हे प्रश्न सहकारी खात्यास तात्काळ हातीं घेतले पाहिजेत. नाशिक आणि केरा ह्या बँकांवरील आपत्तीमुळें सहकारी संस्थांवरील लोकांचा विश्वास शिथिल होण्याची प्रवृत्ति कोठें दिसून आली असल्यास सरकारच्या आश्वासनानें ती नाहींशी होऊन सहकारी बँकांचें स्थान दृढ होईल असा आम्हांस भरंवसा आहे.

ह्यांत लोकांची जबाबदारी कोणती ?

दुःस्थितींतल्या दोन जिल्हा बँकांचे संबंधानें लक्ष ठेवून सरकारनें त्यांस सहानुभूतीनें वागवलें आणि सहाय केलें आणि तसेंच, इतर बँकांच्या सांपत्तिक परिस्थितीची चौकशी करून त्यांच्या भक्कमपणाविषयीं जनतेची खातरजमा केली ह्याबद्दल त्याचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. तथापि, येथें दोन महत्त्वाचे प्रश्न उद्भवतात, त्यांचा आस्थापूर्वक विचार झाला पाहिजे. दोन जिल्हा बँक्स कित्येक वर्षे वाईट स्थितींत राहून शेवटीं त्या गुंडाळाव्या लागतात ह्याबाबत सहकारी कार्यकर्ते आणि त्यांच्या बिनसरकारी संघटनात्मक प्रातिनिधिक संस्था ह्यांची कांहीं जबाबदारी आहे कीं नाहीं ? सहकारी चळवळ लोकांची आहे आणि तिच्या बऱ्यावाइटाबद्दल तेच जबाबदार असले पाहिजेत हें मूलभूत तत्व सर्वमान्य आहे. असें असतां दोन जिल्हा बँका डबघाईस आल्या असूनहि त्यांच्या परिस्थितीची व ती सुधारण्याची जबाबदारी सहकारी कार्यकर्त्यांनीं कां उचलली नाहीं ? जिल्हा बँका ह्या मोठ्या संस्था आहेत आणि त्यांत जाणते कार्यकर्ते असतात व असावे अशी अपेक्षा आहे.

त्यांच्याहि बाबतींत सरकारनें काळजी वहावी आणि लोकांनीं त्यावर अवलंबून राहून स्वतःची जबाबदारी ओळखूं नये हें सहकारी चळवळीची सुस्थिति आणि प्रगति ह्यांचे दृष्टीनें योग्य आहे काय? "दुसऱ्या बँकांची सध्याची समाधानकारक स्थिति अशीच टिकण्यासाठीं आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी सरकार करील" असें आश्वासन आपल्या पत्रकांत त्यांनीं दिलें ह्याबद्दल जनता त्यांचे आभार मानील ह्यांत शंका नाहीं. पण बँकचे भागीदार आणि चालक व त्याचप्रमाणें सहकारी प्रातिनिधिक संस्था ह्यांचें प्रस्तुत बाबतींत स्थान कोणतें? हा प्रश्न उरतोच. गुंडाळल्या जाणाऱ्या दोन बँका बिघडण्यास कारणें काय झालीं, त्यांच्या सुधारणेचे कोणते प्रयत्न झाले आणि त्यांस यश कां आलें नाहीं ह्याची तपशीलवार माहिती सहकारी कार्यकर्त्यांस मिळणें तसेंच अगत्याचें आहे असें आम्हांस वाटतें. ह्या माहितीवरून लोकांस योग्य बोध घेतां येऊन नाशीक आणि केरा ह्यांचे संबंधांत चुका झाल्या असल्यास त्या टाळण्याची व्यवस्था करतां येईल. सहकारी चळवळ लोकांच्या स्वावलंबनाचे पायावरच दृढ होणें अगत्याचें आहे हें सरकार आणि जनता ह्यांनीं ध्यानांत वागवलें पाहिजे.

रक्तांतर आणि पितृत्व

रक्तांतराचा उपयोग व्याधिनिवारणाकडे कसा व किती होतो याबद्दल मी मागें एकदां लिहिलेंच आहे.* पण त्याशिवाय रक्तांतराचा उपयोग कोर्ट दरबारीसुद्धा पुराव्यासाठीं होतो हें वाचून पुष्कळांस मौज वाटेल, या कल्पनेनें खालील माहिती दिली आहे.

माणसा–माणसांचें रक्त एकमेकांत टोंचून रक्तांतरक्षमतेवरून त्यांच्या शरीरावर होणाऱ्या समवैषम्यावरून निरनिराळ्या मनुष्यांच्या रक्ताचें शारीरशास्त्रवेत्त्यांनीं चार वर्ग पाडले आहेत. आपण त्यांना म, न, अ, व प असें संबोधूं. आतां अनुवंशाच्या दृष्टीनें विचार केल्यास प्रत्येक मुलाच्या रक्ताचा वर्ग, रक्तांतर केलें असतांना आईच्या रक्ताशीं, त्याचप्रमाणें बापाच्या रक्ताशीं समक्रिया करणारा असतो; विरोधी नसतो. यामुळें आईचें किंवा बापाचें रक्त मुलाच्या रक्तांत अपाय न घडतां बेमालूमपणानें मिसळूं शकतें. म्हणजे काय कीं, मुलाच्या रक्ताचा वर्ग रक्तांतरदृष्ट्या आई व बाप यांच्या रक्ताच्या मिश्रणासारखा असतो, व म्हणून हा एक सर्वसामान्य निरपवाद नियम आहे असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं.

आतां कल्पना करा कीं एका विवाहित बाईवर अनैतिक संबंधापासून मूल झाल्याचा आरोप आहे व त्याबद्दल तिजवर कोर्टांत खटला चालू आहे. वादीतर्फे असें सांगण्यांत आलें कीं, या बाईला हा मुलगा 'क्ष' या अज्ञात इसमापासून झाला आहे. बाईनें गुन्हा नाकबूल करून तो मुलगा आपणांस नवऱ्यापासून झाला असें ठासून सांगितलें, तर तिजवरील आरोप सिद्ध कसा व्हावा?

अशा नाजूक खटल्यांत इंग्लंड वगैरे देशांत रक्तांतराची कसोटी लावण्याची पद्धत दृढ होऊं लागली आहे व या कसोटीनें मिळणाऱ्या पुराव्यास कोर्ट महत्त्वाचें स्थान देतें. केव्हांहि झालें तरी मातृत्व ही वस्तुस्थिती असते व पितृत्व हें प्रत्यंतर पुराव्यांनीं सिद्ध करावें लागतें. अशा स्थितींत पितृत्वाच्या वस्तुस्थितीचा खराखुरा कमी अधिक उलगडा जर कशानें होत असेल तर तो फक्त रक्तांतराच्याच कसोटीनें होतो. कसा तो पहा.

रक्तपरीक्षेअंतीं बाईच्या नवऱ्याच्या रक्ताचा वर्ग 'म' आहे असें आढळून आलें; मुलाच्या आईच्या रक्ताचा वर्ग 'न' आहे असें आढळून आलें व मुलाच्या रक्ताचा वर्ग 'नन' आहे असें आढळून आलें; तर यावरून अनुमान काय काढावयाचें? वर सांगितलेल्या नियमाप्रमाणें मुलाच्या रक्ताचा वर्ग 'मन' असावयास हवा होता. तो ज्या अर्थी 'नन' आहे त्या अर्थी या मुलाचा बाप बाईचा नवरा असणें शक्य नाहीं; तो कोणीतरी वेगळाच--'न' वर्गाचें रक्त असलेला प्राणी--असला पाहिजे. अर्थात् 'न' वर्गाचें रक्त असलेल्या अनेक व्यक्ती असूं शकतील व त्यांतलिच 'क्ष' ही एक व्यक्ति असेल इतकाच पुरावा या परीक्षेनें मिळाला. रक्तांतर परीक्षेचा हाच मोठा उपयोग आहे. ह्या मुलाचा हाच बाप हें जरी सांगतां आलें नाहीं तरी ह्या मुलाचा भिन्न वर्गाच्या रक्ताचा अमुक इसम बाप असणें शक्य नाहीं हें निश्चितपणें सांगतां येते. एकूण, रक्तांतर परीक्षेनें उत्तर नकारार्थी असल्यास निश्चितपणें सांगतां येतें, पण होकारार्थी असल्यास अमूकच व्यक्ति असें सांगतां येत नाहीं आणि खरोखर वरीलसारख्या खटल्यांत नकारार्थी कां होईना पण उत्तर निश्चित सांगतां येतें हा फायदा कांहीं कमी नाहीं. अविज्ञात अनिश्चिततेपेक्षां सशास्त्र, विज्ञात, नकारात्मक निश्चिती जास्त बरी व तिचाच प्रामुख्यानें विचार करून कोर्ट अशा खटल्यांत निर्णय देतें.

आपल्याकडे अजूनपर्यंत कोर्टामध्यें असा पुरावा दाखल केल्याचें ऐकिवांत नाहीं. परंतु लवकरच जर तशी वेळ आली तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें फारसें कांहीं नाहीं हें येथें नमूद करून ठेवलेलें बरें; कारण इतर देशांत हल्ली ही पद्धत जारीनें अमलांत येऊं लागली आहे.

त्र्यं. शं. म.

* अर्थ, जून २२, १९३८; पृष्ठ ३०९

शेअरवर चांगलें डिव्हिडंड वाटणाऱ्या
एका कारखान्याला ६ महिने ते ५ वर्षं मुदतीच्या
ठेवी घेणें आहेत

व्याज मुदतीप्रमाणें द. सा. द. शें. ४ ते ६ टक्के दिलें जातें. माहिती मागवितांना रक्कम किती व केव्हां गुंतविणें आहे तें लिहावें.
आत्माराम रावजी भट, C/o केसरी कचेरी, पुणें २.

अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक लि., कऱ्हाड

भागीदारांस नोटीस

अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेच्या भागिदारांची एकतिसावी वार्षिक साधारण सभा रविवार, तारीख ४–९–३८ रोजीं दुपारीं दोन वाजतां बँकेच्या इमारतींत भरणार आहे. त्यावेळीं सन १९३७–३८ चा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, नफ्याची वांटणी मंजूर करणें, पोट नियम दुरुस्ती मंजूर करणें वगैरे कामें करणेंत येतील. सदर वेळीं भागीदारांनीं येणेंचें करावें अशी विनंति आहे.

कराड, तारीख १–८–३८ — व्ही. पी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

स्फुट विचार

जगांत सोन्याचा वाढता पुरवठा

सोन्याचें इतर मालासारखें नाहीं. इतर जिन्नस तयार झाले असतां त्यांस गिऱ्हाइक मिळण्याची अनेकदां अडचण भासते. सोन्यास गिऱ्हाइक नेहमी तयार असतें. दक्षिण आफ्रिका, अमेरिका, रशिया, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इत्यादि देशांत निघालेलें सोनें तेथील मध्यवर्ती बँका विशिष्ट करारांप्रमाणें किंवा सरकारी हुकुमानें खरेदी करतात. मध्यवर्ती बँका कांहीं सोनें स्वतःपाशीं ठेवतात किंवा सर्वच बाहेरच्या देशांत पाठवतात. सोन्याच्या देवघेवींचें जगांतलें प्रमुख ठिकाण लंडन हें आहे आणि त्याचा व्यापार तेथील सहा मोठ्या कंपन्यांच्या हातांत आहे. एन. एम. रॉथशिल्ड अँड सन्स, सॅम्युअल मॉंटेग्यू अँड कंपनी, मोकाटा अँड गोल्डस्मिट्ट, शार्प्स अँड वुइलकिन्स, पिक्सले अँड आबेल आणि जॉन्सन मॅथे अँड कंपनी ह्या त्या कंपन्या होत. ह्या कंपन्यांचे प्रतिनिधी दररोज अकरा वाजतां मेसर्स रॉथशिल्ड ह्यांच्या कचेरींत जातात आणि दर औंसास सोन्याची किंमत शिलिंग-पेन्सांत किती असावी हें ठरवतात. इंग्लंडमध्यें ही किंमत सध्या कायद्यानें निश्चित झालेली नसल्यानें रोजच्या मागणी--पुरवठ्याच्या मानानें ती ठरवली जाते. त्या किंमतीचा पुकारा विद्युत्संदेशानें सर्व जगभर होतो आणि तिला अनुसरून सोन्याच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार होतात. लंडनमध्यें भाव निश्चित होतांच तेथें झालेल्या सोन्याच्या व्यवहारांची किंमत १९३७ सालीं सुमारें १६५ कोटि रुपये भरली. विशिष्ट कसाच्या शुद्ध सोन्याच्या आणि सुवर्णनाण्यांच्या चिपांच्या स्वरूपांत ही देवघेव होते. त्या चिपांवर कस लावल्याबद्दलचा ठराविक छाप असावा लागतो. एकंदर पुरवठ्याच्या मानानें जगांत दागदागिन्यांत वगैरे फारच थोडें सोनें वापरण्यांत येतें आणि त्याचा उपयोग मुख्यत्वेंकरून चलनांचा आधार म्हणून संचय निर्माण करण्याकडे केला जातो. हिंदी लोक सोनें दागदागिन्यांत घालतात, ह्या कारणानें त्याचा चलनासाठी आवश्यक असलेला पुरवठा मर्यादित होतो ह्या हाकाटींत कांहींच तथ्य नाहीं, असें वर दिलेल्या आकड्यांवरून दिसून येईल. प्लॅटिनम धातूचा उपयोग सोन्याऐवजी करण्याची प्रवृत्ति उद्योगधंद्यांत वाढत आहे. चलनाचा आधार म्हणूनच सोन्याचें महत्त्व विशेष आहे आणि त्याविषयींची लोकांची आवड कायम राहिली आहे.

म्युनिसिपॅलिटयांचा गैरशिस्त कारभार

मुंबई प्रांतांतील म्युनिसिपालटयांच्या उत्पन्न-खर्चासंबंधीं सरकारचा १९३६-३७ सालचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून म्युनिसिपालटयांच्या कारभारांत सुधारणा होण्यास अद्याप बराच वाव असल्याचें दिसून येतें. मुंबई प्रांतांत एकूण १३० म्युनिसिपालटया आहेत, त्यांचें अहवालाचे सालीं एकूण उत्पन्न १ कोटि, ९० लक्ष रुपये भरलें आणि त्यांचा एकूण खर्च १ कोटि, ८५ लक्ष रुपये झाला. १९३५-३६ सालाचे तत्सम आकडे अनुक्रमें १ कोटि, ८९ लक्ष आणि १ कोटि, ८० लक्ष असे होते. ह्या सर्व आकड्यांत केवळ नेहमीच्या मामुली उत्पन्न-खर्चाचा समावेश आहे; कर्जउभारणी आणि कर्जफेड ह्यांचा त्यांत अंतर्भाव नाहीं. अहवालाचे वर्षी म्युनिसिपालटयांस कराचे रूपानें मिळालेल्या उत्पन्नापैकीं शेकडा ६४ इतकी रकम घरभाडें, ड्रेनेजपट्टी, ह्यांसारख्या नागरिकांवरील प्रत्यक्ष करांपासून जमा झाली आणि उरलेली शेकडा ३६ इतकी रकम अप्रत्यक्ष करांनीं मिळवून दिली. म्युनिसिपालट्यांनीं आपल्या खर्चाच्या शेकडा ४ इतक्या रकमेचा विनियोग नागरिकांस वैद्यकीय सहाय देण्याकडे करावा, असें सरकारनें ठरवून दिलें असतांहि २७ म्युनिसिपालट्यांनीं तेवढाहि खर्च औषधपाण्यावर केला नाहीं, हें त्यांस दूषणास्पद आहे. म्युनिसिपालट्यांच्या येण्यांची वसुली दिरंगाईवर पडत असून, त्याचे दुष्परिणाम दूरवर पोचल्याचें आढळतें, असा अहवालांत उल्लेख आहे. लहान म्युनिसिपालट्यांच्या कारभारांत तर गैरशिस्तपणा विशेषच आढळून येतो. नगरपित्यांमध्यें जबाबदारीच्या जाणीवेचा अभाव, व्यक्तिगत भांडणांत वेळाचा अपव्यय, संस्थेचें सभासदत्व ही सेवेची संधी आहे असें न मानतां तें मानाचें चिन्ह आहे असें समजण्याची प्रवृत्ति, इत्यादि अनिष्ट गोष्टी म्युनिसिपल कारभारांत अव्यवस्था आणि गोंधळ माजविण्यास कारणीभूत होतात, असा अनेक वर्षांचा अनुभव आहे. ह्या परिस्थितींत सुधारणा होणें आवश्यक आहे. स्वार्थत्यागपूर्वक जनसेवा करण्याचा पायंडा राज्यकारभाराचे क्षेत्रांत आतां दृढ होऊं लागला असून मोठ्या जबाबदारीच्या जागांवर अनेक लायक लोक स्वतःची पदरमोड करून काम करीत आहेत. ह्याचा इष्ट असा परिणाम इतर क्षेत्रांतील कार्यकर्त्यांवरहि झाल्यावांचून रहाणार नाहीं, अशी उमेद सरकारी अहवालांत व्यक्त करण्यांत आली आहे.

"एम्प्लॉयमेंट ब्यूरो"ची मर्यादित उपयुक्तता

मुंबई विश्वविद्यालयाच्या सेनेटची सभा ता. १७ ऑगस्ट रोजीं भरणार आहे, त्यावेळीं प्रोफेसर एस. आर. दावर ह्यांनीं पाठविलेल्या "एम्प्लॉयमेंट ब्यूरो" संबंधींतील सूचनेचा विचार होणार आहे. मुंबई विश्वविद्यालयांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांस नोकरी मिळविण्यास सहाय करण्यासाठी एक ब्यूरो स्थापन करावा, असा प्रो. दावर ह्यांचा ठराव आहे. हा ठराव सेनेटकडे पाठवितांना सिंडिकेटनें त्यावर आपलें मत प्रदर्शित केलें आहे. विश्वविद्यालयानें केवळ ब्यूरो स्थापन केल्यानें पदवीधरांस नोकरी मिळणें सुलभ होणार नाहीं; नोकरी देणें ज्यांच्या हातीं आहे, अशा संस्थांचें म्हणजे सरकारचें आणि औद्योगिक व व्यापारी मंडळ्यांचें त्यास सहकार्य लाभणें आवश्यक आहे, अशा अर्थाचा आपला रिपोर्ट सिंडिकेटनें सेनेटला केला आहे. आपल्या पोटापाण्याचा प्रश्न सुटावा, ह्यासाठीं शिक्षण घेणारेच बहुसंख्य विद्यार्थी असतात आणि त्यांचा संबंध व्यापारी आणि कारखानदार ह्यांच्याशीं आल्याविना, दोघांची सांगड बसणें अशक्य आहे. सुशिक्षितांच्या बेकारीचें मूळ कारण त्यांची संख्या मागणीपेक्षा मोठी आहे, हेंच असल्यामुळें, बेकार उमेदवारांची यादी तयार करून ठेवणाऱ्या संस्थांचे स्थापनेनेंच केवळ बेकारीचा प्रश्न सुटणार नाहीं, हें उघड आहे. नोकरी देणारांनीं ह्या यादींतील उमेदवारांस प्राधान्य देण्याचें ठरवून ब्यूरोशीं सहकार्य केलें, तरच त्याचा व्यावहारिक उपयोग होईल. सिंडिकेटनें प्रदर्शित केलेलें मत वस्तुस्थितीस धरूनच आहे आणि ब्यूरोच्या एकांगी घटनेनें विशेष फायदा होणार नाहीं हें खरें आहे. व्यापारी आणि कारखानदार मंडळ्यांस सुशिक्षित तरुणांस कामावर घेण्यास उद्युक्त करणें, हीच खरी महत्त्वाची कामगिरी होईल. त्याबरोबरच व्यापारांत आणि उद्योगधंद्यांत यशस्वी रीतीनें सहाय करतील, असे तरूण उमेदवार विश्वविद्यालयानें निर्माण केले पाहिजेत. प्रि. दावर ह्यांच्या सूचनेप्रमाणें ब्यूरो स्थापन

झाल्यानें व्यापाऱ्यांस आणि कारखानदारांस उमेदवारांची यादी उपलब्ध होईल ह्यांत शंका नाहीं. परंतु विश्वविद्यालयानें ह्याच्यापुढें जाऊन नोकऱ्या देणारांचें सहकार्य मिळवण्याचा पद्धतशीर प्रयत्न करणें आवश्यक होईल.

हिंदी विमा कंपन्यांस प्राधान्य—सरकारचा स्तुत्य उपक्रम

मुंबई प्रांतिक सरकारनें आपल्या अधिकारांतील विम्याचें सर्व काम हिंदी कंपन्यांकडे सोपविण्याचें ठरविलें असल्याचें मागेंच जाहीर झालें आहे. कांग्रेसच्या नियंत्रणाखालील इतर प्रांतांनींहि हें धोरण स्वीकारल्यास हिंदी कंपन्यांचे उत्पन्नांत सालिना आठ लक्ष रुपये भर पडेल, असा अजमास आहे. इंडियन इन्शुअरन्स कंपनीज असोसिएशनकडे मुंबई सरकार आपलें विम्याचें काम देणार असून, असोसिएशन आपल्या सभासद-कंपन्यांत तें काम वांटून घेणार आहे, असें प्रसिद्ध झालें आहे. असोसिएशननें इतर प्रांतिक सरकारांकडे आणि कांग्रेसच्या वर्किंग कमिटीकडे आपली योजना पाठविली आहे. सहकारी सोसायट्या, कोर्टाकडील ट्रस्टी, रिसीव्हर्स, कोर्टस् ऑफ वॉर्ड्स, ॲडमिनिस्ट्रेटर जनरल, पोर्ट ट्रस्ट, इत्यादींचीं विम्याचीं कामें, त्याचप्रमाणें सरकारी जमिनी व इमारती ह्यांचे भाडेकरी आणि सरकारी कर्जानें घेतलेल्या मोटारींचे मालक ह्यांचीं विम्याचीं कामेंहि सरकारच्या अधिकाराबाहेर नाहींत. हिंदी व्यवसायांस सहाय करण्याचें प्रस्तुत धोरण अभिनंदनीय आणि अनुकरणीय आहे, ह्यांत संशय नाहीं.

रोखे बाजारांत मार्जिन्सची सक्ती

मुंबईमधील रोखे बाजारांत चालणाऱ्या अमर्याद सट्टेबाजीस आळा बसावा, ह्या दृष्टीनें चौकशी करून उपाययोजना सुचविण्यासाठीं मॉरिसन कमिटीची नेमणूक झाली होती. तिच्या सूचनांस अनुसरून मुंबई सरकार क्रमाक्रमानें रोखे बाजारांतील व्यवहारांचें नियंत्रण घडवून आणण्याचा यत्न करीत आहे. स्वतःचे पुरेसे पैसे नसतांना, बाजारभावाच्या चढउतारावर सट्टेबाजी करणाऱ्या लोकांचे व्यवहार मर्यादित करून, त्यांस तफावतीच्या मानानें आवश्यक ती रकम अनामत ठेवणें भाग पाडण्याचा सरकारचा विचार आहे. ह्यासंबंधांत निश्चित योजना आखण्यास सरकारनें स्टॉक एक्सचेंजच्या नियंत्रक संस्थेसच सांगितलें आहे. तथापि तिला मार्जिन्सची पद्धति पसंत नाहीं. "अपुऱ्या पैशावर मोठे सौदे करणाऱ्या दलालांची संख्या अत्यल्प असल्यानें नियोजित नियंत्रणामुळें बहुसंख्य चांगल्या सभासदांची मात्र निष्कारण कुचंबणा होणार आहे; बदल्याचे व्यवहारांत तफावतीच्या रकमेची मागणी न करतां बँका आणि श्रॉफ आज सर्रास कोट्यवधि रुपये कर्जाऊ देत आहेत; सरकारनें सुचविलेल्या मार्जिन्सची अंमलबजावणी परिणामकारक होणें अशक्य आहे" इत्यादि मुद्दे मुंबई स्टॉक एक्सचेंजनें आपल्या उत्तरांत नमूद केले आहेत. अशा प्रकारचें बंधन एकट्या मुंबईतील बाजारावरच लादणें इष्ट नाहीं; हिंदुस्थानांत सर्वत्र ही व्यवस्था चालू झाली पाहिजे; केवळ मुंबईमध्यें मार्जिन्सची पद्धत अंमलांत आणल्यास हा धंदा कलकत्ता आणि मद्रास ह्या शहरांकडे जाईल, इत्यादि इतर मुद्दे सरकारपुढें मागेंच मांडण्यांत आले होते ते विचारांत घेऊन सरकारनें फेटाळून लावले आहेत. रोखेबाजारांतील सट्टेबाजीस आळा घालून तेथील व्यवहार सुनियंत्रित करण्याचें मुंबई सरकारचें धोरण लोकहितसंवर्धक आहे, ह्यांत शंका नाहीं. बेजबाबदार धंदेवाल्यांचे व्यवहार त्यामुळें सुरक्षितपणाच्या मर्यादेंत येऊन रोखे बाजारास स्थैर्य प्राप्त होईल. चालू व्यवस्थेंत सुधारणा होण्यास कित्येक सट्टेवाल्यांचा आणि त्यांच्या व्यवहारांपासून फायदा मिळवणाऱ्या लोकांचा विरोध होणें साहजिक आहे. परंतु सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें इष्ट असलेले फेरबदल त्या विरोधास दाद न देतां सरकारनें घडवून आणणें आवश्यक आहे.

हाडांपासून खत—मुंबई सरकारची मदत

इकडे तिकडे पडलेलीं हाडें गोळा करून तीं फळकाऱ्या अगर इतर काडीकचरा यांचे सहाय्यानें जाळून नंतर चुन्याचे चक्कींतून पीठ करून तें खतासाठीं उपयोगांत आणावें व सरकारनें ह्यासाठीं देतां येईल तें आर्थिक सहाय्य द्यावें व शेतकऱ्यांची उत्पादन शक्ति वाढवावी अशी विनंति मुंबई इलाख्यांतील ग्रामोद्योग संघानें सरकारास केली होती व तालुक्यांतील कोणत्याहि शेतकी संस्थेमार्फत हें सहाय्य करावें म्हणून योजना सरकारकडे पाठविली होती. ह्या खताचा बागाईत पिकांस व फळझाडांस फार उपयोग होतो ह्याचा अनुभव शेतकी खात्यास व ह्याचा उपयोग करणाऱ्या शेतकऱ्यांना आलेला आहेच.

ह्या योजनेसंबंधीं सरकारकडून असा खुलासा आला आहे कीं, अशा प्रकारचें सहाय्य देण्यास सरकारची मान्यता आहे व शेतकी खात्यानें ह्या गोष्टीकडे लक्ष दिलें असून प्रत्येक जिल्ह्याचे कलेक्टरसाहेबांना ह्या बाबतींत माहिती कळविली आहे. ग्रामसुधारणा जिल्हा मंडळ व मे. कलेक्टरसाहेब यांचे मतानुसार ज्या विवक्षित ठिकाणीं अशा मदतीची जरूरी आहे त्या ठिकाणीं ग्रामसुधारणा जिल्हा कमिटीचे निधींतून मदत मिळूं शकेल व जेथें विशेष सहाय्य पाहिजे असेल तेथें ती गोष्ट शेतकी खात्याचे डायरेक्टरसाहेब व मे. कलेक्टरसाहेब यांचेमार्फत सरकारचे नजरेस आणावी.

हा सरकारचा खुलासा निरनिराळ्या संस्थांनीं व कार्यकर्त्यांनीं लक्षांत घेऊन ह्याचा शक्य तितका उपयोग करून घ्यावा अशी विनंति आहे.

वैकुंठ ल. मेहता,
सभासद,
व्यवस्थापक मंडळ, अ. भा. ग्रामोद्योग संघ.

मुंबई, ५-८-३८.

अंड्यांची प्रतवारी

मुंबई शहरांत विकल्या जाणाऱ्या अंड्यांचें सरासरी वजन १½ औंसांपेक्षा ज्यास्त नसतें. कांहीं अंडीं १¾ औंस भरलीं तरी कांहीं अंडीं १ औंसहि भरत नाहींत. साधारणपणें अंड्यांचा बाजारभाव सहा आणे डझन असा असतो; म्हणजे प्रत्येक रुपयास सरासरीनें ४० औंस वजनाचीं अंडीं मिळतात. तथापि, अंड्यांची विक्री वजनावर होत नाहीं ह्यामुळें गिऱ्हाइकास आपल्या पैशाचा योग्य मोबदला मिळतोच असें नाहीं. अंड्यांची प्रतवार लावली असतां हा प्रश्न सुटून विक्रेता आणि खरेदीदार ह्यांपैकीं कोणाचेंच नुकसान होणार नाहीं, ह्या दृष्टीनें मार्केटिंग अधिकारी प्रयत्न करीत आहे.

दि सदर्न निटिंग वर्क्सला ना. पाटील यांची भेट

गेल्या शुक्रवारीं येथील दि सदर्न निटिंग वर्क्स या गंजीफ्रॉक व इतर तत्सम होजिअरी माल मोठ्या प्रमाणावर तयार करणाऱ्या कारखान्याला मुंबई सरकारचे उद्योगमंत्री ना. लक्ष्मणराव पाटील यांनीं भेट दिली. ना. पाटील यांच्याबरोबर श्री. ह. मो. जोशी, श्री. द. वा. फडके व आमदार बाबुराव वाळवेकर हे होते. या प्रसंगीं कारखान्याच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष, मुंबईचे होजिअरी मालाचे प्रसिद्ध व्यापारी शेठ द्वारकादास हरिदास ऊर्फ काकुभाई बखारिया, संचालक मंडळापैकीं श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी, श्रीमंत बाबुराव साळवेकर व श्री. रघुनाथराव सोहोनी, मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष प्रो. वामन गोविंद काळे व सेक्रेटरी श्री. आत्माराम रावजी भट, मुंबई सरकारनें नेमलेल्या औद्योगिक सल्लागार मंडळाचे सदस्य व कॉमनवेल्थ विमा कंपनीचे मॅनेजिंग एजंट श्री. रामभाऊ अभ्यंकर व श्री. न. ग. पवार कॉन्ट्रॅक्टर, दिवाण बहादुर व्ही. जी. शेट्ये, लोकमान्य स्वदेशी समितीचे सेक्रेटरी श्री. न. ग. आपटे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रभृति मंडळी उपस्थित होती. ना. पाटील हे येतांच कारखान्याचे मॅनेजिंग एजंट श्री. रामभाऊ कुलकर्णी व श्री. काकासाहेब सुपणेकर यांनीं त्यांचें स्वागत केलें.

उपस्थित मंडळींसह ना. पाटील यांचें छायाचित्र घेण्यांत आल्यावर श्री. कुलकर्णी, श्री. सुपणेकर व श्री. आ. रा. भट यांनीं त्यांना सुतापासून होजिअरीचें कापड तयार होऊन त्यापासून गंजीफ्रॉक व इतर होजिअरीचा माल कसा बनतो याचे निरनिराळे टप्पे दाखवून कृतींची माहिती दिली. कारखान्यांत देशी सूत वापरण्यांत येतें व कारखान्यांत लागणारा कामगार-कारागीर वर्ग मोफत शिक्षण देऊन तयार करण्यांत येतो वगैरे माहिती ऐकल्यावर नामदारांना आनंद झाला. जपानांतील व हिंदुस्थानांतील मुंबई इलाख्याबाहेरील या धंद्याची परिस्थिति काय आहे, जपानांत हा धंदा विशेष यशस्वी कां झाला, हिंदुस्थानांत त्याबाबत काय करतां येण्यासारखें आहे, वगैरे गोष्टींची ना. पाटील यांनीं आस्थेनें चौकशी केली. विद्युतशक्तीविना घरीं बसून हातानें गंजीफ्रॉक, स्वेटर वगैरे माल तयार करण्याच्या यंत्राबद्दल ना. पाटील यांना विशेष कुतूहल वाटून त्यांनीं घरगुती धंदा म्हणून होजिअरीचा धंदा करतां येण्याच्या शक्यतेची श्री. कुलकर्णी, श्री. सुपणेकर व श्री. आ. रा. भट यांजबरोबर चर्चा केली. या कारखान्यांत सुतापासून कापड बनून त्यापासून हरतऱ्हेचा माल तर तयार होतोच परंतु यंत्रसामुग्री नीट करण्याकरितां कारखान्याचें स्वतःचें वर्कशॉप आहे व कारखान्यांतच माल भरण्याच्या पेट्या करण्याची व्यवस्थाहि आहे हें पाहून कारखान्याच्या स्वयंपूर्णतेबद्दल ना. पाटील यांनीं समाधान व्यक्त केलें.

कारखाना पाहून झाल्यावर उपस्थित मंडळींसमवेत ना. पाटील यांना अल्पोपाहार देण्यांत आला. कारखान्याच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष शेठ द्वारकादास हरिदास ऊर्फ काकुभाई यांनीं ना. पाटील यांना पुष्पहार घातल्यावर ना. पाटील यांनीं छोटेसें भाषण केलें. ते म्हणाले: 'महाराष्ट्र उद्योगधंद्यांत मागासलेला आहे. व त्यामुळेंच तो गरीब आहे. सदर्न निटिंग वर्क्सच्या कारखान्याची व्यवस्था, टापटीप, त्यानें यशस्वी रीतीनें परदेशी मालाशीं चालविलेली स्पर्धा व त्याचें पुढें पडणारें पाऊल हीं पाहून मला समाधान वाटतें. उद्योगधंद्याच्या वाढीनेंच महाराष्ट्राचा आर्थिक उत्कर्ष होणार आहे. या कारखान्याला व इतर उद्योगधंद्यांना मुंबई सरकार त्यांना शक्य असेल तें सहाय अवश्य करील.' श्री. रघुनाथराव सोहोनी यांनीं आभार मानल्यावर हा कार्यक्रम समाप्त झाला.

उपहारगृहें आणि भोजनालयें ह्यांच्या मालकांची सभा

रविवार ता. ७ ऑगस्ट रोजीं, पुण्यांतील उपहारगृहें आणि भोजनालयें ह्यांच्या मालकांची एक खासगी सभा पुणें गेस्ट हाउसचे मालक, श्री. सरपोतदार, ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. अस्पृश्यांना भोजनालयांत व उपहारगृहांत मुक्तद्वार असावें, ह्या नियमाची अंमलबजावणी सरकारनें अहमदाबाद, नगर इत्यादि ठिकाणीं सुरू केली आहे. त्याचा विचार करणें हा सभा बोलावण्यांतील उद्देश होता. नियमाच्या अंमलबजावणीमुळें धंद्यांत काय अडचणी येतील, आर्थिक नुकसान होईल काय, इत्यादि प्रश्नांचा सभेनें विचार केला आणि आपलें म्हणणें जबाबदार अधिकाऱ्यांपुढें मांडण्यासाठी तिनें शिष्टमंडळ नेमलें. तूर्त नियमाची अंमलबजावणी तहकूब करावी, अशी सभेनें सरकारास विनंति केली.

त्रावणकोर बँक गुंडाळली जाणार ?

त्रावणकोर नॅशनल ॲन्ड क्विलॉन बँक ही क्विलॉन डिस्ट्रिक्ट कोर्टाचे हुकुमान्वयें गुंडाळण्यांत यावी, असा क्विलॉन डिस्ट्रिक्ट जज्जानें हुकूम दिला आहे. " रिझर्व्ह बँकेची चौकशी पुरी होईपर्यंत क्विलॉन बँकेचें प्रकरण तहकूब ठेवण्यापासून कांहीं फायदा होण्याजोगा नाहीं; रिझर्व्ह बँकेस आपलें मत प्रदर्शित करतां येण्यास बराच अवधि लागेल आणि तोंपर्यंत कालहरण होऊन त्रावणकोर बँकेच्या येण्यांच्या वसुलीवर प्रतिकूल परिणाम होईल " अशा अर्थाची रिझर्व्ह बँकेनें त्रावणकोर सरकारास तार पाठविली होती, ती कोर्टानें विचारांत घेऊनच हुकूम दिला. बँक गुंडाळण्याचें कामांत इतर ठिकाणचीं लिक्विडेशन कोर्टें क्विलॉन डिस्ट्रिक्ट कोर्टास आवश्यक तें सहाय्य करतील, अशी आशा जज्जांनीं व्यक्त केली.

इमारतीच्या नकाशास ३ हजार रुपये

कलकत्ता येथें चित्तरंजन ॲव्हेन्यूमध्यें अजमीर येथील जनरल ॲशुअरन्स सोसायटीस एक सहा मजली इमारत बांधावयाची आहे. ह्या इमारतीच्या नकाशापैकीं जो नकाशा पसंत पडेल, त्यास कंपनी ३ हजार रुपये बक्षीस देणार आहे. नकाशे पाठविण्याची अखेरची तारीख ३१ ऑगस्ट, १९३८ ही आहे.

पूर्वीची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें

द. म. द. शें. ४ चार आणे व्याजानें

व

अनुक्रमानें रु. १०० ते २०००

देण्याची नवीन योजना. लवकर अर्ज करा, लवकर कर्ज मिळवा. त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ०२ आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.

हेड ऑफिस-गिरगांव, मुंबई. ब्रँच-लक्ष्मी रोड, पुणें नं. २.

सहकारी चळवळ

इ. डी. ससून टर्की रेड डायवर्क्स प. स. पतपेढी, लि.

१२ वी वार्षिक साधारण सभा

(लि. आ. म.)

वरील पतपेढीची बारावी वार्षिक साधारण सभा ता. २९-७-३८ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां, कंपनीचे सुपरिंटेंडेंट मि. टी. ई. हारकर यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती.

पतपेढीच्या वार्षिक अहवालाकडे पाहिलें, तर जरी या पेढीचें कार्यक्षेत्र मर्यादित असलें तरी ही एक उच्च दर्जाची व आदर्श अशी पेढी आहे हें दिसून येतें. किंबहुना मुंबई गिरणगांवांत हिशेबासारख्या व्यवस्थित चालविल्या जाणाऱ्या फारच थोड्या पतपेढ्या असाव्यात.

पतपेढीच्या सभासदांमध्यें व भांडवलामध्यें त्याचप्रमाणें गंगाजळीमध्यें सुद्धां चांगली भर पडली आहे. लोकांनीं यावर्षी कर्जे कमी घेतलीं आहेत यावरून सोसायटीमुळें लोकांची स्थिति सुधारण्यास मदत झाली असें दिसून येतें. सोसायटी 'अ' वर्गात असून तिनें भागावर ५% डिव्हिडंड व कर्जदारांनीं भरलेल्या व्याजांत ६¼% सूट दिली यावरून सर्वसाधारण बँकांपेक्षा या सोसायटीमध्यें सभासदांना आपला पैसा किती किफायतशीर रितीनें गुंतवितां येतो हें दिसतें. मारवाड्यांच्या तसेंच पठाणांच्या तडाख्यांतून सभासदांना ऋणमुक्त करावयाचें स्तुत्य कार्य पतपेढी पद्धतशीर रितीनें करीत आहे. सोसायटीनें सभासदांना बचत करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी मासिक ठेव (क्युम्युलेटीव डिपॉझिट), बचत ठेव (सेव्हिंग्ज डिपॉझिट), सभासदाचा विमा वगैरे नवीन उपक्रम सुरू करून ते यशस्वी करून दाखविलेले आहेत.

अध्यक्ष मि. हारकर यांनीं आपल्या भाषणांत सोसायटीचें कार्यक्षेत्र वाढविण्याबद्दल सूचना केली. सोसायट्यांचा उपक्रम प्रामुख्यतः खाटकसरीची संवय लावण्याचे हेतूनेंच १५ वर्षांपूर्वी सुरू केला गेला व त्याचा सुपरिणाम आतां दिसत आहे असें त्यांनीं सांगितलें. इ. डी. ससून कंपनीची कामगारांविषयींची कळकळ सर्वश्रुत आहे. इंग्लंडमध्यें सध्या प्रचंड स्वरूपांत असलेल्या सोसायट्यांचा प्रारंभ किती छोटेखानी स्वरूपांत झाला होता हें स्वानुभवावरून सांगून कंपनीचे वेल्फेअर सेक्रेटरी श्री. रेगे यांनीं त्याविषयीं माहिती करून घ्यावी असें सांगितलें.

हारकर साहेबांच्या वरील योग्य सूचनेचा विचार करून जर कंपनी आपल्या एखाद्या अधिकाऱ्यास इंग्लंड, डेन्मार्क, स्विडन वगैरे परकी देशांतील सहकारी चळवळीचा अभ्यास व प्रत्यक्ष माहिती घेण्यास वर्ष-दीड वर्ष धाडील तर या खर्चाचें योग्य चीज व सार्थक कंपनीपुरतेंच होईल एवढेंच नव्हे तर ह्या इलाख्यांतील किंबहुना हिंदुस्थान देशांतील सहकारी चळवळीला मोठी मदत, स्फूर्ति व प्रोत्साहन मिळेल हें निर्विवाद आहे.

पुणें पोस्ट्स्, आर. एम. एस्. आणि टेलिग्राफ्स् को. बँक, लि., पुणें.

(वार्षिक सभाः ता. १४-८-३८)

वरील बँकेच्या पटावर १,००१ सभासद असून त्यांपैकीं ४६७ खाटकसर फंडाचे, ७०५ जमीन कसबे भरणारे आणि २०० सेव्हिंग बँकेचे सभासद आहेत. भागांचें वसूल भांडवल २७,१५३ रुपये आहे. बँकेकडे एकूण १,१३,५३५ रुपये कर्ज येणें आहे. ह्या रकमेपैकीं सुमारें ९३ हजार रुपये जात जामिनकीवर, १५ हजार रुपये खाटकसर फंडाचे तारणावर आणि ५½ हजार रुपये पोस्टल विमा पॉलिसीचें तारणावर दिलेले आहेत. १९३७-३८ अखेरच्या व्यवहारांत बँकेस एकूण ३,२२० रुपये नफा झाला, त्यांतून ८०५ रुपये गंगाजळींत टाकावे, ७½ टक्के दरानें डिव्हिडंड देण्यास १,९७४ रुपयांचा विनियोग करावा आणि ४४१ रुपये डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंडास जमा करावे, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. "बँकेचे स्वतःचे इमारतीकरितां पुणें जनरल पोस्टाचे आवारांत बँकेनें पोस्टखात्याकडे जागा मागितली आहे आणि त्या संबंधांत पत्रव्यवहार चालू आहे. पोस्ट-मास्तर जनरलच्या हुकुमावरून बाहेरगांवच्या लाइनमेन वगैरे लोकांच्या कर्जाच्या हप्त्याच्या रकमा पगार बिलांतून वसूल करणेचें बंद झालें आहे. यामुळें टेलिग्राफ खात्याच्या पुण्याबाहेरील सभासदास कर्ज देणें तूर्त बंद आहे" असा रिपोर्टांत उल्लेख आहे. बँकेचें काम समाधानकारक चाललें आहे.

खेडेगांवांत पाणीपुरवठ्याची सोय

मुंबई प्रांताच्या १९३८-३९ च्या अंदाजपत्रकांत खेडेगांवासाठी पाणी पुरवठ्याकरितां १० लक्ष रुपयांची तरतूद आहे. ह्या रकमेपैकीं २० हजार रुपये मांजरी गावास नळाचें पाणी पुरविण्यासाठी आणि १५ लक्ष रुपये सातारा जिल्ह्यांतील कांहीं योजनांसाठीं पुणें येथील रूरल रीकन्स्ट्रक्शन असोसिएशनला देण्याकरितां राखून ठेवण्यांत आले असून उरलेल्या ९ लक्ष, ६४½ हजारांची वांटणी खालीलप्रमाणें करण्यांत आली आहे:—

मध्यविभाग	२,७२,५०० रु.
दक्षिण विभाग	२,१८,००० रु.
	१,१०,००० रु.
उत्तर विभाग	२,५९,५०० रु.
सरकारच्या जवळ शिल्लक	१,०४,५०० रु.
एकूण	९,६४,५०० रु.

ग्रेटब्रिटनमधील आयुर्विम्याची प्रगति

गेल्या वर्षी (१९३७ सालीं) ग्रेट ब्रिटनमधील आयुर्विमा कंपन्यांच्या कामांत, १९३६ च्या मानानें बरीच मोठी भर पडली. सोड किंमत घेणारांची संख्या कमी झाली, हें सर्वसाधारण आर्थिक सुबत्तेचें लक्षण आहे. गेल्या सालीं ब्रिटिश कंपन्यांच्या खर्चाचे प्रमाणांतहि घट झाली. नवीन कामांत मोठी वाढ होऊनहि खर्चाचें प्रमाण उतरलें, हें मुद्दाम निर्दिष्ट केलें पाहिजे. आपले पैसे किफायतशीरपणें गुंतविण्याची कंपन्यांस अडचण भासत आहे व त्यांस पडलेल्या व्याजाच्या दरांत उतार झालेला दिसून येतो. १९३७ सालीं १९ कंपन्यांचें मूल्य मापन झालें, त्यांपैकीं फक्त एका कंपनीनेंच आपला बोनसचा दर वाढविला. ह्यापुढें व्याजाचें उत्पन्न उतरत जाईल, हें गृहीत धरूनच दूरदर्शीपणानें कंपन्या आपले रिझर्व्ह वाढवीत आहेत. गेल्या वर्षी ग्रेटब्रिटनमधील कंपन्यांनीं एकूण ६,१५,००० विमा पॉलिसी दिल्या, त्यांची किंमत सुमारें ३ अब्ज, ३० कोटि रुपये भरली.

संग्रहालयांचें महत्त्व

[औंध येथील श्री.भवानी-चित्र पदार्थ-संग्रहालयाचा उद्घाटन-समारंभ हिंदुस्थान सरकारचे एज्युकेशन मेंबर, सर जगदीश प्रसाद, ह्यांचे हस्तें नुकताच झाला, त्यावेळीं श्री. भा. वि. धारपुरे, क्युरेटर, लॉ. रे. इं. म्यूझियम, पुणें, यांनीं भाषण केलें त्यांतील कांहीं उतारे खाली दिले आहेत.]

"आज ज्या संग्रहालयाचें उद्घाटन झालेलें आहे तो 'श्री भवानी चित्रसंग्रहालय,' न्यूयॉर्क येथील कार्नेजी कार्पोरेशनच्या आर्थिक उदार आश्रयानें लंडन येथील एंपायर म्यूझियम्स असोसिएशन या संस्थेनें अखिल हिंदुस्थानांतील संग्रहालयांची पाहाणी केली व त्यामुळें जी जागृति झाली तिचाच परिणाम आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. १९३४ सालीं हिंदुस्थानच्या इंग्लंडमधील हाय कमिशनरनीं या पहाणीचे संबंधांत एक पत्रक प्रसिद्ध केलें व त्यानंतर येथील संग्रहालयांची ब्रिटिश तज्ज्ञांच्या एका कमिटीनें पहाणी केली. या पहाणीचा अहवालहि प्रसिद्ध झाला आणि आतां हिंदुस्थान सरकार, प्रांतिक सरकार आणि सर्व संस्थानें हीं संग्रहालयांची स्थापना, संरक्षण आणि संवर्धन याबद्दल खडबडून जागीं होऊन विचार करीत आहेत. या पाहणीच्या अहवालांत हिंदुस्थानांतील संग्रहालयांची स्थिति अत्यंत शोचनीय आहे असें उघडकीस आलें आहे. तसेंच, संग्रहालयांचे बाबतींत जनता अगदीं बेफिकीर आहे असाहि अभिप्राय अहवालांत नमूद केला आहे. युरोपमध्यें दर पंधरवड्यास एक नवीन संग्रहालय स्थापन होतो असें म्हणतात. या प्रगतीशीं तुलना केली असतां आपण या बाबतींत फार मागें आहोंत आणि अहवालामध्यें केलेली निर्भत्सना योग्यच आहे. तसेंच इतक्या प्रगतीशीं बरोबरी करण्याचेंहि आपणांमध्यें सामर्थ्य नाहीं.

स्थैर्याच्या दृष्टीनें पाहूं गेले असतां, हिंदुस्थानांत ज्याची सर्वोत्कृष्ट कायदेशीर सुव्यवस्था आहे असा संग्रहालय म्हटला म्हणजे कलकत्ता येथील 'इंडियन म्यूझियम' हा होय. या संग्रहालयाच्या विश्वस्त समितीचे प्रमुख कलकत्ता येथील सरन्यायाधीश हे असतात. इंडियन म्यूझियम ॲक्ट नांवाचा हिंदुस्थान सरकारचा कायदा १८६६ सालीं झाला. हा कायदा पूर्ण व व्यापक आहे. अशा तऱ्हेची कायदेशीर स्थैर्य देणारी व्यवस्था प्रत्येक संग्रहालयास असणें आवश्यक आहे. हिंदुस्थानांतील कित्येक संग्रहालयांची व्यवस्था या कायद्यानुसार झालेली आहे.

ज्याप्रमाणें युरोप व अमेरिका येथील संग्रहालयें शिक्षणप्रधान असतात आणि शिक्षणक्षेत्रांत महत्कार्य करतात त्याप्रमाणें जर हिंदुस्थानांतील संग्रहालयांच्या हातून चांगलें काम व्हावयाचें असेल तर त्यांनीं हिंदुस्थानच्या ३० कोटि जनतेमध्यें जागृति, शिक्षण व संशोधनाचें कार्य नेटानें केलें पाहिजे.

इंग्लंडमधील साऊथ केन्सिंग्टन हें, संग्रहालयांपासून देशाचें अपरिमित हित कसें होतें याचें एक मोठें उत्कृष्ट उदाहरण आहे. या संग्रहालयापासून कोणकोणते फायदे जनतेस झाले हें थोडक्यांत पुढें दिले आहेत.

यानें मॉरिशस येथील उंसाची लागवड नाश पावणार होती ती वांचविली. तारा व टेलिफोन यांचे खांबांस कीड लागूं दिली नाहीं, प्लेग व डास यांसंबंधीं संशोधन केलें, इजिप्तमध्यें पाण्यांत कांहीं रोग होते त्यांचें संशोधन करून त्या रोगांचें निराकरण केलें आणि सैन्यांतील शिपायांस वांचविलें. धान्यांच्या कोठारांना लागणारी कीड शोधून काढली व त्यापासून होणारें नुकसान थांबविलें. जनावरें व गव्हाचीं पिकें यांस अपाय करणारी रोग व कीड यांचें संशोधन केलें व त्याचें निराकरण केलें. इंग्लंडमध्यें येऊन पडलेल्या एका विमानाच्या लाकडाचें संशोधन केलें व त्या सारखेंच विमानास उपयुक्त असें दुसरें लाकूड शोधून काढलें. इ. इ.

जगांतील उत्कृष्ट संग्रहालयांचें किंवा वर सांगितलेल्या साऊथ केन्सिंग्टन संग्रहालयाचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवून त्यांचें अनुकरण आपण केलें पाहिजे."

हिंदी साबणाच्या धंद्याची प्रगति

हिंदुस्थानांतील एक हजार कारखान्यांत दर साल तयार होणाऱ्या साबणाची किंमत सुमारें ३ कोटी, ४२½ लक्ष रुपये भरते. ह्या उत्पादनाचें वर्गीकरण खालीलप्रमाणें आहे:—

साबणाचा प्रकार	वजन (टन)	किंमत (रु.)
घरगुती वापराचे	५० हजार	२ कोटि
अंगास लावण्याचे	१५ "	१ कोटि, १२½ लक्ष
औद्योगिक व्यवसायास लागणारे	१० "	३० लक्ष

हिंदी साबणाचें उत्पादन वाढत आहे, त्याबरोबर विदेशी साबणाची आयात उतरत आहे. १९२०-२१ सालीं २ कोटि ४ लक्ष रुपयांचा विदेशी साबण हिंदुस्थानांत आला; १९३६ सालीं त्याच्या आयातीची किंमत २७ लक्ष रुपये भरली.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स

वरील संस्थेच्या सभासदांचे संख्येंत झपाट्यानें वाढ होत आहे. १९३७ अखेर एकूण ३,५६१ सभासद तिचे पटावर होते. संस्थेतर्फे घेण्यांत येणाऱ्या परीक्षांसहि सालोसाल जास्त उमेदवार बसत आहेत. १९३७ सालीं एकूण १०१ ठिकाणीं परीक्षा घेण्यांत आल्या आणि त्यांस १,२६८ विद्यार्थी बसले. इन्स्टिट्यूटतर्फे एक त्रैमासिक चालविण्यांत येतें, त्यांत बँकिंग संबंधीं उपयुक्त लेख प्रसिद्ध होतात. इन्स्टिट्यूटची मुख्य कचेरी मुंबई येथें असून, तिच्या उपशाखा कलकत्ता, अहमदाबाद, पुणें लाहोर, कराची आणि दिल्ली येथें आहेत. इन्स्टिट्यूटची अकरावी साधारण सभा मुंबई येथें ता. ८ ऑगस्ट रोजीं भरली होती.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

मोटारगाड्यांचें हिंदुस्थानांत उत्पादन

नियोजित कारखाना

मोटारगाड्यांचें हिंदुस्थानांत उत्पादन किफायतशीरपणें करतां येईल, असा सर विश्वेश्वर अय्यासारख्या तज्ज्ञांस विश्वास वाटत आहे. मद्रास प्रांताचे उद्योग मंत्री श्री. गिरी ह्यांनीं ह्या बाबत प्रयत्न चालविले आहेत. सर विश्वेश्वर अय्या ह्यांची योजना खालील प्रमाणें आहे:—

(१) कारखान्याची स्थापना मुंबई येथें करावी. १५० लक्ष रुपयांच्या भांडवलापैकीं ९० लक्ष रुपये इमारती, यंत्रसामुग्री इत्यादींसाठीं लागतील आणि ६० लक्ष रुपये खेळतें भांडवल म्हणून राहील.

(२) प्रारंभीं दोन प्रकारच्या गाड्या तयार कराव्यात. (अ) मध्यम आकाराच्या उतारूंच्या गाड्या व (ब) मालाच्या गाड्या. "बेबी" गाड्यांचेंहि उत्पादन नंतर हातीं घ्यावें.

(३) पहिल्या वर्षीं सुटे भाग परदेशांतून मागवून त्यांपासून मोटारगाड्या बनविण्याचें काम हातीं घ्यावें. दुसऱ्या वर्षीं, ह्या सुट्या भागांपैकीं कांहीं निवडक भागांच्या उत्पादनास प्रारंभ करावा. तिसऱ्या वर्षांत सर्व भाग कारखान्यांत तयार व्हावेत. "एंजिन हा मोटार गाडीचा आत्मा आहे; तेव्हां तें हिंदुस्थानांत बनवितां आल्याविना कारखान्याचें उद्दिष्ट साध्य होणार नाहीं" असें सर विश्वेश्वर अय्या ह्यांचें म्हणणें आहे.

(४) प्रारंभीं कांहीं काळ अमेरिकन, ब्रिटिश अगर युरोपिअन उत्पादकांचें सहाय घ्यावें लागेल.

(५) कारखान्यांतून सालिना १० हजार मोटारी आणि ५,००० लॉऱ्या बाहेर पडूं शकतील. वर्षांतून १२ हजार नग निघाले, तर गुंतविलेल्या भांडवलावर २० ते ४० टक्के नफा पडूं शकेल.

(६) ह्या कारखान्यांत बनविलेल्या मोटारी प्रत्येकी १,८०० रुपयांस विकतां येतील. पॅकिंग, वहातुक, विमा, आयात जकात, बंदरांच्या पट्ट्या, इत्यादिमुळें प्रत्येक विदेशी गाडीच्या किंमतींत एक हजार रुपयांची वाढ होते. हिंदुस्थानांत गाड्या तयार झाल्या म्हणजे गिऱ्हाइकास हा खर्च पडणार नाहीं.

(७) हिंदुस्थान सरकार परदेशी गाड्यांवर संरक्षक जकात बसवून देशी धंद्यास सहाय देईल, अशी अपेक्षा आहे.

(८) लष्करी खातें, रेल्वेज आणि इतर सरकारी खातीं ह्यांस लागणाऱ्या गाड्यांची खरेदी करतांना देशी गाड्यांसच प्राधान्य देण्याचें धोरण सरकारनें स्वीकारलें पाहिजे.

रजिस्ट्रेशन खात्याचा त्रैवार्षिक अहवाल

मुंबई प्रांतांतील रजिस्ट्रेशन खात्याच्या ताज्या अहवालावरून असें समजतें कीं, १९३५-३७ ह्या तीन वर्षांचे अवधींत ह्या प्रांतांत एकूण २,६१,३६९ दस्तऐवज नोंदले गेले. व्याजाचे दर सर्वत्र पडले असल्यामुळें स्थावर इस्टेट करण्याची लोकांची प्रवृत्ति वाढत आहे, हें १९३२-३४ ह्या तीन वर्षांतील नोंदणीपेक्षा १९३५-३७ ह्या तीन वर्षांतील नोंदणी १२½ हजारांनीं जास्त आहे ह्यावरून स्पष्ट होतें. एकूण १,८६१ विल्स (मृत्युपत्रें) ह्या मुदतींत नोंदलीं गेलीं. सहकारी सोसायट्यांच्या कागदपत्रांच्या नोंदणीस माफी नसती, तर सरकारास ४८½ हजार रुपये जास्त मिळाले असते. १९३७ सालीं लँड मॉर्गेज बँकांचे एकूण १,००६ दस्त नोंदले गेले, त्यांवरील फीच्या माफीची रकम ५,१६९ रुपये झाली.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव्ह् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

१ बारामती (जि. पुणें)	१६ अकलूज (जि. सोलापूर)
२ सातारा („ सातारा)	१७ विरमगांव („ अहमदाबाद)
३ इस्लामपूर („ „)	१८ धुळें („ प. खानदेश)
४ कऱ्हाड („ „)	१९ दोंडाईचें („ „)
५ तासगांव („ „)	२० शिरपूर („ „)
६ किर्लोस्करवाडी („ „)	२१ शहादें („ „)
७ शिराळें („ „)	२२ नंदुरबार („ „)
८ कोरेगांव („ „)	२३ साक्री („ „)
९ भिवंडी („ „)	२४ शिंदखेडें („ „)
१० अहमदनगर („ अहमदनगर)	२५ तळोदें („ „)
११ शेवगांव („ „)	२६ मालेगांव („ नाशिक)
१२ कोपरगांव („ „)	२७ सटाणा („ „)
१३ वाई („ ठाणें)	२८ कळवण („ „)
१४ पालघर („ „)	२९ दोहद („ पंचमहाल)
१५ कल्याण („ „)	३० कालोला

खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून)	३%

सरकारी कर्जरोखे

५% करमाफ लोन (१९४५–५५)	११८—३
५% (१९३९–४४) लोन	१०३—७
४% १९४३	१०८–१०
३½% बिनमुदत	९९—४
३½% १९४७–५०	१०६—६
२¾% १९४८–५२	१००—८

निमसरकारी रोखे

४% पोर्ट ट्रस्ट (बिगर गॅरंटी व लांब मुदत) ...	१११—०
४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत)	१०९–१२
४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड (७० वर्षे मुदत)	१०९–१२
४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३)	११२—४
५% म्हैसूर कर्ज (१९५५)	१२४—४

मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

बँका

बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११%	१४१—०
बँक ऑफ बडोदा (१००—५०) १०%	११५—०
सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% ...	३१–१२
इंपीरिअल बँक (५००) १२%	१५५५—०
बाँबे मॉ. को. बँक (५०) ६%	६०—०
रिझर्व्ह बँक (१००) ३½%	११८—४

रेल्वेज

दौंड–बारामती (१००) ४½%	१०२—०
पाचोरा–जामनेर (१००) ४½%	९६—४
अहमदाबाद प्रांतज (५००) १२½%	९६३–१२
तापी व्हॅली (५००) ७½%	७४७—८

वीज

बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३%	११७—८
कराची (१००) ९%	२१०—०
पुणें इलेक्ट्रिक (१००) ९%	१९२—८
टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½%	१३६७—०
आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½%	१४६०—०

इतर

बेलापूर शुगर (५०) ७ रु.	१६८—०
इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु.	४१—०
शिंदिया स्टीम (१५) १ रु.	२०—१
न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. ...	३९—४
ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ...	४४५०—०
टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६%	२०७—८
टाटा आयर्न दु. प्रे. (२००) १५ रु. २ आ. ...	१५९—८
टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १० रु.	२७२—०
टाटा आयर्न डिफर्ड (३०) ३६ रु. ३ आ. ६ पै ...	११९५—०

सोनें–चांदी

सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास	३५–१४–३
चांदी (मिंट) प्रत्येक १०० तोळ्यास	५१–२–०

६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर–डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त " आयुर्विम्या "चे योगेंच साधतां येते.

कॉमनवेल्थ विमा कंपनी

लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर

बी. ए. एलएल. बी.

मॅनेजिंग एजंट.

दि प्रॉव्हिन्शिअल बँक

ऑफ अिण्डिया लिमिटेड

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन) बंगलूर

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : **खानसाहेब हाजी अहमद कासम**, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर : **अेस्. पी. ठाकर.**

करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् : १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् : ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

कायम मुदतीच्या ठेवी : दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटींवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधींची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट पुणें.

एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २

अप-टु-डेट शिलाई करतां

महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें   १२ तासांत कपडे शिवून मिळतील.   [खादी भांडाराचे माडीवर

पराडकर टेलर्स ॲकॅडिमी

(सिटी पोस्टासमोर पुणें २)
येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

रु. १४,५०० आणि त्याखेरीज नफा.

वार्षिक हप्ता रु. १७५ भरून दरमहा रु. ४१-१०-८ वीस वर्षेपर्यंत मिळून त्याखेरीज रु. ५०००|— रक्कम व नफा मिळेल. भरलेल्या हप्त्यावर शें. ९ टक्के व्याज.

एम्. कानजी ॲण्ड कंपनी, मॅनेजिंग एजन्टस्   एस. सूर्यराव आणि कंपनी, महाराष्ट्राचे मुख्य एजन्टस्

धी युनिव्हर्सल फायर ॲण्ड जनरल इन्शुअरन्स कंपनी लि., लक्ष्मीरोड, पुणें.

सुप्रसिद्ध संचालक मंडळ व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां **महाराष्ट्र, कर्नाटक** आणि **गोमांतक** प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

(हेड ऑफिस : जळगांव)

माहिती मागवा   चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, गणपती चौक, पुणें २

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २
[माहितीपत्रक मागवा]

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण

संगीत-मार्गदर्शक

मालेचीं पुस्तकें.

गायन	हार्मोनियम	दिलरुबा	फिडल्
किं. ६ आ.	किं. २॥ रु.	किं. १ रु. २ आ.	किं. १ रु. ४ आ.

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.
प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा

मोती चौक : : : सातारा

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.